प्रेसनोट

दि.२३/०८/२०१७

**संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक, उत्तर विभाग, गुन्हे शाखा, पुणे शहर पथकाकडून सराईत गुन्हेगारांना अटक करुन आरटिओ पासिंग न झालेली नवीन ३ वाहने जप्त**

दिनांक ०३/०८/२०१७ रोजी संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक, उत्तर प्रादेशिक विभाग, गुन्हे शाखे मधिल **पोहवा ३८८८ हजरत पठाण यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,** इसम नामे १) रफिक उमर जमादार रा. चिंचवड, पुणे व २) विष्णु भागुजी शिंगाडे रा. निगडी, पुणे यांनी **पिंपरी परिसरातुन कंपनीच्या गोडाऊनवर टेहाळणी करुन रखवालदाराची नजर चुकवुन आरटिओ पासींग न झालेल्या नवीन गाडया चोरुन नेहुन** गेवराई जि. बीड येथे विक्रीसाठी गिराईक शोधत असलेबाबत खात्रीशीर बातमी मिळाल्याने पोलीस निरीक्षक पो.नि.श्री. ब्रम्हानंद नाईकवाडी यांनी मा. वरीष्ठांची पुर्व परवानगी घेवुन तात्काळ पोलीस स्टाफसह गेवराई जिल्हा बीड येथे जावुन, बातमी प्रमाणे सापळा लावला त्यामध्ये गेवराई जि. बीड येथे वर नमुद दोन्ही सराईत गुन्हेगार हे एका नवीन टाटा ४०७ टेम्पोसह विक्रीसाठी थांबलेले दिसल्याने, तेथे त्यांना सिताफीने पकडुन त्यांचेकडे केले तपासात त्यांनी सदरचा टेम्पो हा भोसरी पुणे येथुन चोरल्याचे कबुल केले. तसेच त्याव्यतिरिक्त आणखी एक होंडा सिटी कार व एक महिद्रा टि यु व्ही जिप, एक टाटा ११०९ ट्रक अशी वाहने चोरल्याचे सांगितले. **तसेच तपासात पुढील प्रमाणे निष्पन्न झाल्याने त्यांना अटक केली आहे.**

१) रफीक ऊमर जमादार, वय ३० वर्षे, रा. परशुराम नगर, सीफा बेकरी समोर, चिंचवड पुणे
२) विष्णु भागुजी शिंगाडे वय ४७ वर्षे, रा. अजंठा नगर, निगडी पुणे
३) युनुस शौकत शेख वय ३५ रा. पाचेगाव ता.गेवराई जि.बिड
४) अक्रम बिस्मील्ला शेख, वय ४८ वर्षे, रा. संभाजीनगर, बसस्टॅड जवळ, जालना
५) चंद्रकांत सुनिल आठवले वय २३ वर्षे, रा. कालीपुर्ती, पोस्ट ऑफिसजवळ, जालना
६) शब्बीर मुनीर शेख वय ३५ वर्षे,रा. खाजा गरीब नवाज कॉलनी, औरंगाबादरोड, जालना

**सदर आरोपींनी पुढील प्रमाणे गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.**

| | | |
|---|---|---|
| १. | पिंपरी पोस्टे गुरंन ४४१/१७ भा. क. ३७९,३४,४११ | - होंडा सिटि कार किं.रु. १२,९६,७६०/- |
| २. | भोसरी पोस्टे गुरंन ६६/१७ भा. क. ३७९,३४ - | टाटा टॅम्पो ४०७ किं.रु. ०६,६५,०००/- |
| ३. | भोसरी एमआयडीसी पोस्टे गुरनं १६६/१७ भा.क. ३७९,३४,४११ | टाटा ट्रक ११०९ किं.रु. १३,३१,८८६/- |
| ४. | चाकण पोस्टे गुरनं ३५८/१७ भा. क. ३७९,३४,४११ | महिंद्रा जिप टियुव्ही कि.रु. ०८,५१,०००/- |
| | **एकुण किंमत.** | ४१,४४,६४६/- |

असे चार गुन्हे उघडकीस आले आहेत. पैकी वर नमुद आरोपी व्यतिरिक्त जालना येथील **ट्रक विकत घेणारा मुख्य आरोपी मजहर खान रा. बस स्थानक जवळ,जालना ता. जि. जालना हा पळुन गेलेला आहे.** सदर बाबत तपास चालु आहे. वर नमुद आरोपी पैकी अनुक्रम नं १ ते २ व ४ ते ६ यांची दिनांक २४/०८/२०१७ रोजी पर्यत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आलेली आहे.

**यातील आरोपी रफिक उमर जमादार हा पिंपरी चिंचवड परीसरातील रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे .** त्याचे विरुध्द दरोडा, चोरी, वाहनचोरी चे गुन्हे दाखल आहेत. (१) पिंपरी पोलीस ठाणे गु.र.नं.३३२/२००४, भा.द.वि.क.३७९ (२) निगडी पोलीस ठाणे गुरनं.२६९/०५ भादवि.३८०,३४,(३) निगडी पोलीस ठाणे गुरनं.३९३/२००९ भादविक.३८०,३४ (४) निगडी पोलीस ठाणे गुरनं.३१७/२०१२ भादविक.३७९ सदरचा आरोपी हा कंपनीच्या गोडाऊनवर टेहाळणी करुन रखवालदाराची नजर चुकवुन पासींग न झालेल्या गाडया चोरुन नेहत असतो

सदरची कारवाई ही मा. अपर पोलीस आयुक्त सो. श्री प्रदीप देशपांडे मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री पंकज डहाणे सो., मा. सहा पोलीस आयुक्त, गुन्हे- २ श्री संजय निकम सो., यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री ब्रम्हानंद नाईकवाडी, सपोनि गणेश पवार, पो.उप निरी. पी.डी. गायकवाड, पोहवा हजरत पठाण, भालचंद्र बोरकर, दिपक भुजबळ, राज देशमुख, पोना गाडे, पोना अतुल मेंगे, पोशि विठठल बंडगर, चापोना शितल शिंदे पोशि दत्ता फुलसंदर, सहा फौज पांडुळे, सोनवणे, पोहवा राजु मोरे, रमेश भिसे, पोना प्रदीप शेलार, पोना नवनाथ चांदणे, दिनेश साबळे, कांतीलाल बनसुडे, यांनी केली आहे.